ePaper

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 10 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तृणमूल काँग्रेसच्या 3 माजी खासदारांचा भाजपामध्ये प्रवेश






पान 3 वरुन...

पिंपरी-चिंचवडच्या प्रभाग समित्यांवर 'महिला राज'

### अमित शाह यांच्या उपस्थितीत चार राज्यांमध्ये सहमती



# सरदार सरोवर करारावर शिक्कामोर्तब!

महाईन्यूज । मुंबई

**सरदार सरोवर प्रकल्पाच्या बांधकाम खर्चाच्या वाटपावर आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या देयकांवर अखेर तोडगा निघाला आहे. केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शाह आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेश या चार राज्यांनी ऐतिहासिक एकरकमी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या निर्णयामुळे आंतरराज्यीय जलव्यवस्थापनाला नवी दिशा मिळणार असून जलसुरक्षा आणि सहकारी संघराज्य व्यवस्थेला बळकटी मिळणार असल्याचे सांगण्यात आले.**

नवी दिल्लीत ७ जुलै रोजी झालेल्या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यासह केंद्र व चारही राज्यांतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सरदार सरोवर प्रकल्पाच्या बांधकामाचा खर्च कोणत्या राज्याने किती उचलायचा आणि परस्परांतील थकीत देयके कशा पद्धतीने निकाली काढायची, यावरून चारही राज्यांमध्ये अनेक वर्षांपासून मतभेद होते. अखेर सामंजस्याने झालेल्या या करारामुळे हा दीर्घकालीन वाद संपुष्टात आला आहे.

यावेळी अमित शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जलसुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी आणि सहकारी संघराज्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. राज्यांमधील समन्वयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न वेगाने मार्गी लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या करारामुळे सरदार सरोवर प्रकल्पातून पाणी आणि वीज वितरण अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. विशेषतः मध्य प्रदेश, गुजरात आणि राजस्थानमधील सिंचन, पिण्याचे पाणी आणि ऊर्जा पुरवठ्याला मोठा लाभ होणार आहे. राजस्थानातील वाळवंटी भागांपर्यंत नर्मदेचे पाणी पोहोचल्याने शेती, स्थानिक अर्थव्यवस्था आणि जमिनीच्या मूल्यामध्ये सकारात्मक बदल झाल्याचेही अमित शाह यांनी सांगितले. देशातील जलविवाद सामंजस्याने सोडविणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, पाण्याचा लाभ अखेरीस भारतीय शेतकऱ्यांनाच होत असल्याने अशा प्रश्नांवर राज्यांनी समन्वयाने मार्ग काढावा, असे आवाहनही त्यांनी केले.

### अनेक वर्षांचा वाद अखेर संपला

सरदार सरोवर प्रकल्पाच्या बांधकामाचा खर्च कोणत्या राज्याने किती उचलायचा आणि परस्परांतील थकीत देयके कशी निकाली काढायची, यावरून चारही राज्यांमध्ये अनेक वर्षांपासून मतभेद होते. अमित शाह यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जलसुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी आणि सहकारी संघराज्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. अनेक राज्यांमध्ये एकाच पक्षाची सरकारे असल्याने परस्पर समन्वय वाढला असून जुने वाद अधिक वेगाने मार्गी लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.



### जलविवाद सामंजस्याने सोडवण्याचे आवाहन

अमित शाह यांनी सांगितले की, देशातील पाण्याचा उपयोग कोणत्याही राज्यात झाला तरी त्याचा लाभ भारतीय शेतकऱ्यांनाच होतो. त्यामुळे जलविवाद दीर्घकाळ प्रलंबित राहिल्यास देशाचे आर्थिक आणि कृषी क्षेत्राचे नुकसान होते. शेजारील राज्यांनी समन्वयाने असे प्रश्न सोडवणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी हरियाणा आणि राजस्थानमधील पाणीवाटपाचा वाद सामंजस्याने निकाली काढण्यात आला होता. त्यानंतर किशाऊ धरण प्रकल्पासंदर्भातील प्रगती आणि आता सरदार सरोवर प्रकल्पाबाबत झालेला चार राज्यांचा करार ही सहकारी संघराज्य व्यवस्थेची महत्त्वाची उदाहरणे असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे देशातील जलवाटपाशी संबंधित अनेक वर्षांचे प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लागत असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# भटक्या कुत्र्यांसाठी पुण्याचे मोठे पाऊल

## भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर आणि त्रासावर नियंत्रण मिळवण्यासाठी महानगरपालिकेचे आधुनिक पाऊल

**महाईन्यूज । पुणे**

**भटक्या श्वानांचे लसीकरण, नसबंदी आणि अचूक नोंदी ठेवण्यासाठी आतापर्यंत दीड हजार श्वानांना मायक्रोचिप बसविण्यात आली असून, पुणे शहराला २०३० पर्यंत रेबीजमुक्त करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे. मायक्रोचिपमुळे प्रत्येक श्वानाची ओळख, लसीकरणाचा इतिहास आणि पुढील उपचारांचे नियोजन अधिक परिणामकारकपणे करता येत असल्याची माहिती महापालिकेच्या प्रमुख पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे-भोसले यांनी दिली.**



शहरात जवळपास निम्म्या भटक्या श्वानांचे रेबीज प्रतिबंधक लसीकरण झाले असून, येत्या दोन वर्षांत उर्वरित लसीकरण पूर्ण करण्याचा महापालिका पशुवैद्यकीय विभागाचा मानस आहे. पुणे महापालिकेच्या हद्दीत नव्याने ३४ गावे समाविष्ट झाल्याने भटक्या श्वानांची संख्या अडीच लाखांवर गेली आहे. गेल्या तीन वर्षांपासून लसीकरण उपक्रम हाती घेतला असून, अद्याप अपुऱ्या मनुष्यबळामुळे निम्मेच लसीकरण झाले आहे. पूर्वी नसबंदी झालेल्या श्वानांची ओळख पटावी, म्हणून त्यांच्या कानाचा कोपरा कापण्याची पद्धत वापरली जात होती. मात्र, मायक्रोचिपमुळे ही पद्धत जवळपास कालबाह्य ठरत आहे. स्कॅनरच्या साहाय्याने १५ ते २० सेंटीमीटर अंतरावरून चिप वाचता येत असल्याने संबंधित श्वानाचे लसीकरण, नसबंदी आणि इतर तपशील काही क्षणांत उपलब्ध होतात.

या संदर्भात डॉ. सारिका फुंडे-भोसले म्हणाल्या, 'मायक्रोचिपमुळे प्रत्येक श्वानाचे ट्रॅकिंग आणि वैद्यकीय नोंदी जतन करणे सुलभ झाले आहे. त्यामुळे लसीकरणाचे नियोजन अचूक करता येते आणि श्वानांवरील अनावश्यक मानवी हस्तक्षेपही कमी होतो. रेबीजमुक्त पुण्याच्या उद्दिष्टासाठी हे तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत आहे.'

जर श्वानाने कोणावर हल्ला केला, तर त्या श्वानाचा इतिहास, लसीकरण या सर्वांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. यासाठी मायक्रोचिप गरजेची आहे. या उपक्रमात महापालिकेचे १९ पशुवैद्यकीय डॉक्टर सहभागी आहेत. वर्षभरात ८० हजार ते एक लाख श्वानांना मायक्रोचिप बसवण्याचा मानस आहे, असे युनिव्हर्सल एनिमल वेल्फेअरच्या सहसंस्थापक डॉ. स्वाती शेळके यांनी सांगितले.

मायक्रोचिप बसविल्यानंतर प्रत्येक भटक्या श्वानाला एक स्वतंत्र ओळख क्रमांक मिळणार असून, त्याची संपूर्ण वैद्यकीय माहिती डिजिटल स्वरूपात नोंदवली जाणार आहे. या तंत्रज्ञानामुळे एकाच श्वानावर पुन्हा लसीकरण किंवा नसबंदी होण्याची शक्यता कमी होऊन महापालिकेचा वेळ आणि खर्चही वाचणार आहे. रेबीज प्रतिबंधासाठी श्वानांचे नियमित लसीकरण आणि नसबंदी हे सर्वात प्रभावी उपाय मानले जात असून, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत आहे. भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासाठी महापालिका, पशुवैद्यकीय तज्ज्ञ आणि स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### पालखी मार्गावरील श्वानांचा बंदोबस्त

आषाढी वारी सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी महापालिकेच्या श्वान बंदोबस्त पथकाने पालखी मार्गावरील २५ भटके श्वान तात्पुरते पकडून निरीक्षणाखाली ठेवले आहेत. पालखी मार्ग मोकळा झाल्यानंतर या श्वानांना पुन्हा त्यांच्या परिसरात सोडण्यात येणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. यामध्ये वारकऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत कोणत्याही प्रकारचा अपघात किंवा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी ही खबरदारी घेण्यात आली आहे. तसेच श्वानांना कोणतीही इजा न करता प्राणीमित्रांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची योग्य काळजी घेतली जात आहे.

# फ्लॅटमध्ये चुल पेटवणे आले होते जिवाशी; पोलिसांकडून रिक्षाचालकाला अटक

**महाईन्यूज । पुणे**

**"घरात चूल पेटवू नका," अशी शेजाऱ्यांची वारंवार विनंती... सोसायटीची समजूत... तरीही सवय काही सुटली नाही. अखेर याच हट्टाने एका रिक्षाचालकासह संपूर्ण इमारतीतील कुटुंबांचा जीव धोक्यात आला. धनकवडीतील राज टॉवरमध्ये घरात चूल पेटविताना पेट्रोलचा वापर केल्याने भीषण आग लागली आणि काही क्षणांतच आगीने वरच्या दोन फ्लॅटनाही विळखा घातला.**



### निष्काळजीपणामुळे इमारतीतील रहिवाशांच्या जीवितास धोका

या निष्काळजीपणामुळे संपूर्ण इमारतीतील रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने सहकारनगर पोलिसांनी सुहास गायकवाड याला अटक केली. या प्रकरणामुळे निष्काळजीपणा करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाईचा इशारा देत पोलिसांनी नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. त्याला न्यायालयातही हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती सहकारनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल पवार यांनी दिली.

या घटनेनंतर सहकारनगर पोलिसांनी सुहास बबन गायकवाड (वय ४८) याला अटक केली आहे. याप्रकरणी हेमा किरण गुजर (वय ४७) यांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सुहास गायकवाड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुहास गायकवाड हा व्यवसायाने रिक्षाचालक असून तो राज टॉवरमधील फ्लॅटमध्ये एकटाच राहत होता. त्याचे आई-वडील हयात नसून त्याच्या दोन बहिणी सदाशिव पेठेत राहतात.

गेल्या काही दिवसांपासून तो घरामध्येच लाकडाची चूल पेटवून स्वयंपाक करीत होता. सोसायटीतील रहिवाशांनी अनेकदा त्याला असे करू नको, आग लागण्याचा धोका आहे, अशी समज दिली होती. मात्र त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. बुधवारी (दि. ८) सकाळी नेहमीप्रमाणे त्याने घरात चूल पेटविण्याचा प्रयत्न केला. मात्र पावसाचे वातावरण असल्याने व ओल्या लाकडामुळे चूल पेटत नसल्याने त्याने त्यावर अधिक प्रमाणात पेट्रोल ओतले.

क्षणार्धात पेट्रोलचा मोठा भडका उडाला आणि संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आगीची तीव्रता इतकी होती की, तिच्या झळा वरच्या दोन फ्लॅटपर्यंत पोहोचल्या. रहिवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. अनेकांनी जीव वाचवण्यासाठी घराबाहेर धाव घेतली, तर तातडीने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली; मात्र तोपर्यंत सुमारे चार लाख सत्तर हजार रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले होते.

# पिंपरी-चिंचवडच्या प्रभाग समित्यांवर 'महिला राज'

## १० पैकी ८ सभापती महिला; भाजपकडून सर्व १० प्रभाग समित्यांसाठी उमेदवारी अर्ज दाखल

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग समिती सभापतीपदाच्या निवडणुकीत यंदा महिला नेतृत्वाचा ठसा उमटणार आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने १० प्रभाग समित्यांसाठी जाहीर केलेल्या उमेदवारांपैकी तब्बल ८ महिलांना संधी दिली आहे. त्यामुळे महापालिकेच्या प्रभाग समित्यांमध्ये यंदा खऱ्या अर्थाने 'महिला राज' पाहायला मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.**

महापालिका प्रशासनाने प्रभाग समिती सभापती निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, १३ जुलै रोजी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत मतदान होणार आहे. भाजपने सर्व १० प्रभाग समित्यांसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. विरोधी पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल न झाल्यास ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भाजपने जाहीर केलेल्या उमेदवारांमध्ये अ प्रभाग समितीसाठी अर्चना कारंडे, ड प्रभाग समितीसाठी सविता खुळे, इ प्रभाग समितीसाठी अर्चना सस्ते, फ प्रभाग समितीसाठी शिवानी नरळे, ग प्रभाग समितीसाठी मनीषा पवार, ह प्रभाग समितीसाठी तृप्ती कांबळे, ज प्रभाग समितीसाठी आरती चोंदे आणि ल प्रभाग समितीसाठी रेखा देवकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर ब प्रभाग समितीसाठी मंदार देशपांडे आणि क प्रभाग समितीसाठी निखिल बोऱ्हाडे या दोन पुरुष उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

महापालिकेच्या प्रभाग समित्या या स्थानिक विकासकामांचे नियोजन, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, विविध विकास प्रस्तावांवर निर्णय तसेच प्रशासनाशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. अशा जबाबदारीच्या पदांवर मोठ्या प्रमाणात महिलांना संधी देत भाजपने महिला नेतृत्वाला प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे.

१३ जुलै रोजी होणाऱ्या निवडणुकीनंतर या उमेदवारांच्या निवडीवर अधिकृत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता असून, प्रभाग समित्यांच्या माध्यमातून शहराच्या विकासात महिला नेतृत्वाची भूमिका अधिक प्रभावी होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### या महिलांना मिळाली संधी

| | |
|---|---|
| अ प्रभाग समिती | – अर्चना कारंडे |
| ड प्रभाग समिती | – सविता खुळे |
| इ प्रभाग समिती | – अर्चना सस्ते |
| फ प्रभाग समिती | – शिवानी नरळे |
| ग प्रभाग समिती | – मनीषा पवार |
| ह प्रभाग समिती | – तृप्ती कांबळे |
| ज प्रभाग समिती | – आरती चोंदे |
| ल प्रभाग समिती | – रेखा देवकर |

### पुरुष उमेदवार

| | |
|---|---|
| ब प्रभाग समिती | – मंदार देशपांडे |
| क प्रभाग समिती | – निखिल बोऱ्हाडे |

### येत्या १३ जुलै रोजी होणार शिक्कामोर्तब...

भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नेतृत्वात महिलांना मोठ्या प्रमाणावर संधी देत महिला सक्षमीकरणाचा संदेश दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. प्रभाग समित्यांच्या माध्यमातून स्थानिक विकासकामांचे नियोजन, नागरिकांच्या प्रश्नांवर निर्णय आणि प्रशासनाशी समन्वय साधण्याची महत्त्वाची जबाबदारी या सभापतींवर असते. अशा परिस्थितीत १० पैकी ८ समित्यांवर महिला नेतृत्व असणे हे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणातील महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. १३ जुलै रोजी होणाऱ्या निवडणुकीनंतर या सर्व नावांवर अधिकृत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता असून, भाजपच्या या निर्णयामुळे महापालिकेतील प्रभाग समित्यांमध्ये यंदा 'महिला राज' प्रस्थापित होणार असल्याचे चित्र आहे.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेशी खेळ; बॅरिकेड्स तोडून पालखी मार्गावर कार घुसवली

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावर लागू करण्यात आलेल्या वाहतूक निर्बंधांकडे दुर्लक्ष करत एका महिलेने पिंपरी-चिंचवडमध्ये हायव्होल्टेज ड्रामा केल्याची घटना घडली. पोलिसांशी शाब्दिक वाद घालत संबंधित महिला काही काळ रस्त्यावर झोपली. त्यानंतर तिने वाहतूक नियंत्रणासाठी उभारलेले बॅरिकेड्स तोडत कार थेट पालखी मार्गावर घुसवली. या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.**

### नेमकं काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार, पालखी प्रस्थानाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवडमध्ये बंदोबस्तासह बॅरिकेडिंग करण्यात आले होते. त्यावेळी ड्रायव्हिंग स्कूल चालवणारी एक महिला कार घेऊन पालखी मार्गावरून जाण्याचा आग्रह धरत होती. पोलिसांनी तिला वाहतूक निर्बंधांची माहिती देत पर्यायी मार्गाचा वापर करण्यास सांगितले. मात्र, यावरून तिची पोलिसांशी शाब्दिक बाचाबाची झाली. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून आळंदी पोलिसांनी प्रकरणाची चौकशी सुरू केल्याची माहिती समोर आली आहे.




आयुक्तालयाच्या कामासाठी झाडांवर कुऱ्हाड चालवावी लागेल. त्यामुळे येथीलच यशदासाठी दिलेल्या जागेपैकी ५० एकर जागा पोलिसांसाठी द्यावी अशी विनंती खासदार श्रीरंग बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या सुमारे ५० एकर जागेवर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुकालय उभारण्यासाठी जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, हा निर्णय घेताना या परिसरातील पर्यावरणीय परिस्थिती, जैवविविधता व मोठ्या प्रमाणावर असलेली वृक्षसंपदा यांचा पुरेसा विचार झालेला दिसून येत नाही.

या परिसरात हुंदाई कंपणीच्या वतीने सीएसआर उपक्रमांतर्गत वनराई संस्थेमार्फत सुमारे ११ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. ही जागा पूर्वापार शेतीची असल्यामुळे तेथे अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात नैसर्गिक व जुने वृक्ष अस्तित्वात आहेत.

अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करून बांधकाम अथवा मैदान विकसित करणे हे पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत अयोग्य ठरेल. शहरातील हरित क्षेत्र टिकविणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे.



## भूमिका

**आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील केवळ धार्मिक परंपरा नसून समता, बंधुता, विवेक आणि मानवतेचा जिवंत उत्सव आहे. शेकडो वर्षांपासून लाखो वारकरी जात, धर्म, पंथ, श्रीमंती-गरिबीचे भेद विसरून एकाच ध्येयाने पंढरपूरकडे चालत असतात. ही वाट भक्तीची असली तरी तिचा मूळ आशय सामाजिक परिवर्तनाचा आहे.**

# संतविचारांची वारी, महाराष्ट्रधर्माची शिदोरी



म्हणूनच वारी म्हणजे समूहभाव, तर महाराष्ट्रधर्म म्हणजे संतांच्या विचारातून घडलेली लोककल्याणाची संस्कृती.

संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, सावता माळी, जनाबाई, गोरा कुंभार, चोखामेळा यांसारख्या संतांनी भक्तीच्या माध्यमातून समाजाला समतेचा आणि विवेकाचा संदेश दिला.

त्यांनी कर्मकांडापेक्षा कर्माला, जातिभेदापेक्षा मानवतेला आणि अंधश्रद्धेपेक्षा प्रबोधनाला महत्त्व दिले. त्यांच्या अभंगांनी सामान्य माणसाला आत्मविश्वास दिला, तर अन्यायाविरोधात उभे राहण्याचे बळही दिले. याच संतपरंपरेचा प्रभाव महात्मा फुले, महादेव गोविंद रानडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांसारख्या समाजसुधारकांवर दिसून येतो. त्यांनी संतांच्या विचारांना आधुनिक सामाजिक परिवर्तनाची दिशा दिली. त्यामुळे वारी ही केवळ श्रद्धेची नव्हे, तर सामाजिक जागृतीची आणि लोकशिक्षणाची चळवळ ठरली.

आज मात्र संतांच्या शिकवणीचा मूळ आशय काही ठिकाणी धर्मांधता, जातीय द्वेष आणि राजकीय स्वार्थाच्या धुरात हरवत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. संतांनी ज्या समतेचा, बंधुभावाचा आणि मानवतेचा पुरस्कार केला, त्यालाच तडा देण्याचे प्रयत्न होताना दिसतात. अशा वेळी वारीचा खरा संदेश नव्याने समजून घेण्याची गरज अधिक आहे.

विठ्ठलभक्ती म्हणजे सर्वांना समान मानणारी जीवनदृष्टी, तर दिंडी म्हणजे सामूहिक जबाबदारीची शाळा होय. वारकरी संप्रदायाने समाजाला "मी"पेक्षा "आपण" मोठे असल्याची शिकवण दिली. हजारो अनोळखी लोक एकमेकांची सेवा करत, शिस्त पाळत आणि परस्पर सहकार्याने प्रवास पूर्ण करतात. हीच लोकशाही, सामाजिक समता आणि सामूहिक जबाबदारीची खरी शिकवण आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा हा अनमोल वारसा पुढील पिढ्यांपर्यंत जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

मृदंग-टाळांच्या निनादात केवळ भक्तिगीतेच नव्हे, तर समतेचे, विवेकाचे आणि मानवतेचे स्वरही घुमले पाहिजेत. पंढरीची वाट चालणारी प्रत्येक पावले संतांच्या विचारांची मशाल बनली, तरच महाराष्ट्रधर्माचा खरा अर्थ जिवंत राहील. समूहभाव, समता आणि प्रबोधन यांच्याच मार्गाने चालणारी वारी हीच महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची खरी दिशा ठरेल.

## प्रासंगिक »

### व्यंग

**पांडुरंग हा स्वभावाने खवचट आणि दुसऱ्यांची चेष्टा करण्यात आनंद मानणारा होता. एके दिवशी तो ऐटीत रस्त्याने चालला असताना त्याला किरण भेटली. किरणला थोडासा तिरळेपणाचा त्रास होता.**

तिचे व्यंग पाहून पांडुरंगने तिला मुद्दाम हिणवण्याच्या हेतूने विचारले, "काय किरण, तुला म्हणे एकाऐवजी दोन-दोन वस्तू दिसतात, हे खरं का?"

किरणच्या लक्षात आले की, पांडुरंग तिच्या व्यंगाची चेष्टा करत आहे. पण ती शांत राहिली. तिने हसतच उत्तर दिले, "हो, खरं आहे. आता तुलाच बघ ना! तुला दोन पाय आहेत, पण मला मात्र चार पाय दिसत आहेत."

किरणचे उत्तर ऐकताच पांडुरंगची बोलती बंद झाली. स्वतः दुसऱ्याला कमी लेखण्याच्या प्रयत्नात तोच लोकांसमोर हास्याचा विषय ठरला. त्या दिवसानंतर त्याला समजले की, कोणाच्याही शारीरिक व्यंगावर किंवा कमतरतेवर विनोद करणे योग्य नाही. प्रत्येक व्यक्तीचा सन्मान राखणे हेच खरे माणुसकीचे लक्षण आहे.

- तात्पर्य : दुसऱ्याच्या व्यंगाची चेष्टा किंवा उपहास करू नये. प्रत्येकाशी आदराने आणि संवेदनशीलतेने वागावे.

महाराष्ट्राच्या राजकारणाची ओळख एकेकाळी सुसंस्कृत लोकशाही, वैचारिक संघर्ष आणि संसदीय परंपरांसाठी होती. सभागृहात सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर कठोर टीका करत.

# 'ठोक'शाहीच्या सावटाखाली महाराष्ट्राची राजकीय संस्कृती



परंतु सभागृहाबाहेर परस्पर सन्मान राखत राज्याच्या प्रश्नांवर चर्चा करत. मतभेद होते, मनभेद नव्हते. आज मात्र ही राजकीय संस्कृती झपाट्याने बदलताना दिसत आहे. संवादाची जागा दादागिरीने आणि विचारांची जागा मारहाणीने घेतली आहे, ही महाराष्ट्रासाठी चिंतेची बाब आहे.

अलीकडील काही घटनांमध्ये लोकप्रतिनिधींनी अधिकारी, कर्मचारी आणि डॉक्टरांवर हात उगारल्याच्या घटना समोर आल्या आहेत. अशा प्रकारच्या वर्तनामुळे लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. कायद्याचे पालन करण्याची शपथ घेतलेलेच लोक कायदा हातात घेत असतील, तर सामान्य नागरिकांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास कसा ठेवायचा, हा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. अशा घटनांमध्ये सर्वाधिक धोकादायक बाब म्हणजे दोषींना अनेकदा राजकीय संरक्षण मिळत असल्याची भावना समाजात निर्माण होते. तात्पुरती निलंबने, गुन्हे दाखल किंवा कारवाईच्या घोषणा होतात; मात्र त्यातून कठोर संदेश जात नाही. परिणामी काही लोकप्रतिनिधींमध्ये कायद्याची भीती उरत नाही आणि दंडेलशाहीलाच राजकीय ताकद समजण्याची प्रवृत्ती वाढीस लागते.

लोकशाहीत लोकप्रतिनिधींचे सामर्थ्य त्यांच्या संयमात, अभ्यासू भूमिकेत आणि जनहितासाठीच्या संघर्षात असते; हात उगारण्यात नव्हे. अधिकारी किंवा डॉक्टरांवर हल्ला करणे म्हणजे केवळ एका व्यक्तीवर अत्याचार नसून संपूर्ण प्रशासन व्यवस्थेचा आणि लोकशाही मूल्यांचा अपमान आहे. त्यामुळे अशा घटनांकडे पक्षीय चष्म्यातून न पाहता सार्वजनिक जीवनातील अधःपतन म्हणून पाहण्याची गरज आहे.

महाराष्ट्राची संत, समाजसुधारक आणि पुरोगामी विचारांची परंपरा संयम, विवेक आणि संवादाची शिकवण देते. त्या परंपरेला साजेशी राजकीय संस्कृती टिकवण्यासाठी सर्व पक्षांनी अशा वर्तनाविरोधात शून्य सहनशीलतेची भूमिका घ्यायला हवी. गुंडशाहीला राजकीय पाठबळ मिळणार नाही, हा स्पष्ट संदेश दिल्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही.

महाराष्ट्राची ओळख 'ठोकशाही'ने नव्हे, तर विचारशक्ती, कायद्याचा सन्मान आणि सुसंस्कृत लोकशाहीनेच कायम राहिली पाहिजे. अन्यथा भविष्यात लोकशाही संस्थांवरील विश्वास ढासळण्याचा धोका अधिक गंभीर ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



आपुलिया हिता जो असे जागता ।
धन्य माता पिता तयाचिया ॥१॥

कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्त्विक ।
तयाचा हरिख वाटे देवा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एकनाथ खडसे भाजपात परतणार?

## "फडणवीसांना बळजबरीने दिल्लीत खेचलं जाईल," ठाकरेंचा दावा

**महाईन्यूज । मुंबई**

**कदाचित देवेंद्र फडणवीस यांना बळजबरीने दिल्लीत खेचून कॅबिनेट मंत्रिपद दिले जाईल, असा सनसनाटी दावा आमदार आदित्य ठाकरे यांनी केला... शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हे लवकरच भाजपात परतणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली... करोना काळात 'मंदिरे उघडा' अशी मागणी करणाऱ्यांना आज स्वतःहून मंदिरे बंद करण्याची वेळ आल्याची टीका आमदार अंबादास दानवे यांनी केली**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील भाषणात वापरलेल्या शब्दांवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तीव्र संताप व्यक्त केला... यंदा प्रथमच मुंबई ठाकरेंमुळे नाही तर पावसामुळे तुंबली, असा सणसणीत टोला आमदार भास्कर जाधव यांनी सत्ताधारी महायुतीला लगावला.

विरोधी पक्षाने विचारलेले प्रश्न तुम्हाला एवढे झोंबत असतील, तर मग तुम्ही त्या खुर्चीवर बसलाच कशाला? तुम्ही ज्या सत्तेच्या खुर्चीवर बसला आहात, तिथे लोक तुम्हाला प्रश्न करणारच. जर भ्रष्टाचार केला असेल, पैसा खाल्ला असेल तर, टीकाही सहन करावी लागेल, असेही आमदार आदित्य ठाकरे म्हणाले.

सूत्रांच्या माहितीनुसार, एकनाथ खडसे यांची भाजपातील संभाव्य घरवापसीच्या निर्णयाचा परिणाम केवळ त्यांच्या वैयक्तिक राजकीय वाटचालीपुरता मर्यादित राहणार नाही, तर जळगावसह उत्तर महाराष्ट्रातील राष्ट्रवादीच्या संघटनात्मक ताकदीवरही होऊ शकतो. त्यामुळे पक्ष नेतृत्वाने वेळ न दवडता खडसे यांची नाराजी दूर करण्याबरोबरच त्यांच्या गटातील कार्यकर्त्यांनाही संघटनेत महत्त्वाची जबाबदारी देण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. करोना काळात 'मंदिरे उघडा' अशी मागणी करणाऱ्यांना आज स्वतःहून मंदिरे बंद करण्याची वेळ आल्याची टीका शिवसेना ठाकरे गटाचे विधानपरिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी केली. आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये दानवे म्हणाले की, करोना संकटकाळात जेव्हा संपूर्ण जग ठप्प झाले होते, तेव्हा याच भाजपाच्या काही लोकांनी 'मंदिरे उघडा' अशी मागणी करणारी पत्रे राज्यपालांना दिली होती. राज्यपालांच्या घराचे उंबरठे झिजवून त्यांनी मंदिरे उघडण्यासाठी प्रचंड आग्रह धरला होता. आता मात्र, निसर्गाची आणि वरुणराजाची चक्री अशी काही फिरली आहे की, त्याच मंडळींवर आज स्वतःहून मंदिरे, पर्यटनस्थळे आणि गावांमध्ये लोकांना 'नो एन्ट्री' घोषित करण्याची वेळ आली आहे.

### फडणवीसांना बळजबरीने दिल्लीत खेचलं जाईल

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) आमदार आदित्य ठाकरे यांनी आज विधीमंडळ परिसरात माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणावर सडकून टीका केली. मुख्यमंत्र्यांनी बुधवारी विधानसभेत दोन तास भाषण केले आणि त्यात खूप थापा मारल्या, अशी टीका आदित्य यांनी केली. त्यांच्या भाषणातून फ्रस्ट्रेशन स्पष्ट दिसत होते. बऱ्याचदा अहंकार हेच नैराश्याचे लक्षण असते. मी याआधीही सांगितले आहे की, मुख्यमंत्री म्हणून हे त्यांचे कदाचित शेवटचे अधिवेशन असू शकते. फडणवीसांना बळजबरीने दिल्लीत खेचून केंद्रीय कॅबिनेट मंत्रिपद दिले जाईल, असा दावाही त्यांनी केला.

### एकनाथ खडसे भाजपात परत जाणार?

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हे लवकरच भाजपात परतणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली. भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी खडसे यांची मुंबईतील निवासस्थानी भेट घेतल्यानंतर या चर्चांना उधाण आले. या भेटीमुळे उत्तर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलण्याच्या शक्यता निर्माण झाली असतानाच शरद पवार गटानेही सावध पावले उचलण्यास सुरुवात केली. खडसे यांच्यासह त्यांच्या समर्थकांना पक्षात कायम ठेवण्यासाठी शरद पवार गटाकडून सध्या संघटनात्मक स्तरावर महत्त्वाचे निर्णय घेतले जात असल्याचे दिसून येते.

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे ५ ते ६ खासदार अस्वस्थ', पृथ्वीराज चव्हाणांचा मोठा दावा

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून अनेक घडामोडी घडत आहेत. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या ६ खासदारांनी काही दिवसांपूर्वी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसला. या सर्व घडामोडी दरम्यान 'ऑपरेशन टायगर'ची मोठी चर्चा झाली.**





त्यानंतर काही दिवसांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे यांनी महायुतीच्या ऑफरबाबत केलेल्या एका वक्तव्यानंतर राजकीय चर्चांना उधाण आलं होतं. त्यांच्या वक्तव्यानंतर 'ऑपरेशन तुतारी'च्या चर्चांनी जोर धरला होता.

या घडामोडीनंतर आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदारांबाबत काँग्रेसचे नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी एक मोठा दावा केला आहे. 'शरद पवारांचे ५ ते ६ खासदार अस्वस्थ असून उद्धव ठाकरे यांच्या पक्षासारखी अवस्था शरद पवारांच्या पक्षाची होऊ शकते', असं वक्तव्य पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांशी बोलताना केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

शरद पवारांच्या ५ ते ६ खासदारांना भारतीय जनता पक्षात घेण्याचा प्रयत्न आहे की एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत? असा प्रश्न पत्रकारांनी पृथ्वीराज चव्हाण यांना विचारला. यावर उत्तर देताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, "मला ते माहिती नाही. मात्र, ते सोडून जाण्याच्या परिस्थितीत किंवा ते अस्वस्थ आहेत, एवढंच मी म्हणत आहे. आता ते सोडून जातील की नाही? हे देखील मला माहिती नाही. मात्र, ते खासदार अस्वस्थ आहेत एवढं मी ऐकत आहे", असं पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

### पृथ्वीराज चव्हाण नेमक काय म्हणाले?

"चिंताजनक बातमी निश्चित आहे, त्यांचे (शरद पवारांची राष्ट्रवादी) ५ ते ६ खासदार अस्वस्थ आहेत. आता ते खासदार काय करतील माहिती नाही. पण त्यासाठी त्यांच्यामागे मोदी-शाह सरकार हात धुवून मागे लागलेलं आहे. विरोधी पक्ष अस्तित्वातच नसावा अशी त्यांची (मोदी-शाह यांची) इच्छा आहे. जे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचं केलं तेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचंही होऊ शकतं", असा मोठा दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

# इथेनॉलवर नितीन गडकरींचे स्पष्टीकरण!

## E20 इंधनामुळे वाहनांच्या मायलेजवर किंचित परिणाम होऊ शकतो

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**“पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलचे कॅलरीफिक मूल्य कमी असल्यामुळे, इंधनात इथेनॉलचे प्रमाण वाढल्यास सरासरी मायलेज थोडं कमी होऊ शकतं. मात्र, बहुतांश वापराच्या बाबतीत हा परिणाम अगदी किरकोळ असेल”, असं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी’द इंडियन एक्सप्रेस’शी बोलताना स्पष्ट केलं. सोशल मीडियावर फिरत असलेले वाहनांच्या नुकसानीचे दावे चुकीचे असून तो एका नियोजनबद्ध खोट्या प्रचाराचा भाग आहे, असंही ते म्हणाले.**



पुणे येथील चाचणी प्रयोगशाळा एआरएआय आणि वाहन उत्पादकांनी घेतलेल्या अनेक चाचण्यांच्या मंजुरीनंतरच गेल्या वर्षी देशभरात E20 मिश्रण (२०% इथेनॉल आणि ८०% पेट्रोल) लागू करण्यात आलं होतं, असं गडकरींनी स्पष्ट केलं. जुन्या गाड्यांच्या काही भागांवर होणाऱ्या किरकोळ परिणामांबद्दल बोलताना गडकरी म्हणाले की, वाहन उत्पादकांना सर्व्हिसिंगदरम्यान ते भाग बदलून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. “E20 इंधनामुळे नुकसान झालेली एक तरी गाडी मला दाखवा. सोशल मीडियावर जे काही फिरत आहे, तो एका नियोजनबद्ध खोट्या प्रचाराचा भाग आहे”, असं त्यांनी सांगितलं.

मायलेजच्या समस्येवर गडकरी म्हणाले, “बघा, यात दोन गोष्टी आहेत, पहिली म्हणजे इथेनॉल आणि पेट्रोलच्या कॅलरीफिक मूल्यांमधील फरक आहे. पण मायलेज हे ड्रायव्हिंगच्या परिस्थितीवरही अवलंबून असतं, विशेषतः दिल्ली किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये, जेथे वाहतुकीच्या परिस्थितीमुळे वाहने कमी गिअरमध्ये चालवावी लागतात... एआरएआय (ARAI) च्या अहवालानुसार, विशेषतः फ्लेक्स-फ्यूएल इंजिनसह तयार केलेल्या वाहनांच्या मायलेज कार्यक्षमतेत कोणतीही समस्या नाही. म्हणूनच आम्ही फ्लेक्स-इंजिन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी काम करत आहोत.”

“सर्व्हिसिंगसाठी जाणाऱ्या जुन्या गाड्यांचे वॉशर्स पूर्वी धातूचे असायचे. आता ते रबरचे आहेत. सर्व्हिसिंगदरम्यान ग्राहकांकडून कोणतेही अतिरिक्त पैसे न घेता ते वॉशर्स बदलून देण्याच्या सूचना आम्ही वाहन उत्पादकांना दिल्या आहेत. माझ्या माहितीनुसार, एकही गाडी नादुरुस्त झालेली नाही. कामगिरीचा विचार केला तर इथेनॉल हे अधिक सरस असल्याचं सिद्ध झालं आहे; त्याचे अँटी-नॉकिंग गुणधर्म खूप चांगले आहेत आणि ऑक्टेन नंबर जास्त आहे.”

फ्लेक्स-फ्यूएल इंजिन तंत्रज्ञानासह टाटा मोटर्स, महिंद्रा, ह्युंदाई, टोयोटा किर्लोस्कर आणि मारुती सुझुकी यांच्यासह जवळपास डझनभर कंपन्या फ्लेक्स मॉडेल्स आणत आहेत, असं मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. ब्राझील १९७० पासून २७ टक्के इथेनॉल-पेट्रोल मिश्रण वापरत आहे, जिथे होंडा आणि ह्युंदाईच्या फ्लेक्स-फ्यूएल इंजिन असलेल्या गाड्या कोणत्याही समस्येशिवाय इथेनॉलवर चालत आहेत.


### मायलेजमध्ये फरक दिसणार

“दिल्ली ते गुरुग्राम दरम्यानच्या थांबत-चालत जाणाऱ्या ट्रॅफिकमध्ये तुम्ही सतत ब्रेक लावता. मात्र, तुम्ही १०० किमी प्रतितास या एकाच वेगाने सलग गाडी चालवली, तर तुम्हाला मायलेजमध्ये काहीसा फरक दिसू शकतो”, असं गडकरी म्हणाले. इंजिन खराब होत असल्याच्या दाव्यांवर गडकरी म्हणाले की, त्यांनी कंपन्यांना अशा काही प्रकरणांची तपासणी करण्यास सांगितलं होतं. त्यातून भेसळयुक्त इंधन यासाठी कारणीभूत असल्याचं आढळून आलं. फ्लेक्स इंजिनमधून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

# ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी पंतप्रधान मोदींबरोबर घेतला सेल्फी

**महाईन्यूज । मेलबर्न**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असून मेलबर्नमधील मार्व्हल स्टेडियममध्ये गुरूवारी त्यांनी अनिवासी भारतीयांशी संवाद साधला. यावेळी स्टेडियममध्ये ३०,००० लोकांची उपस्थिती होती. यावरून ‘ये शो हाऊसफुल है’, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदी यांनी यावेळी दिली. या सोहळ्याची प्रसिद्धी पाहून ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांना पंतप्रधान मोदींबरोबर सेल्फी घेण्याचा मोह आवरला नाही.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी ऑपरेशन सिंदूरचा दाखला देत भारताची लष्करी क्षमता वाढली असल्याचे अधोरेखित केले.

पहलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर भारताने दहशतवादाला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दिलेले चोख प्रत्युत्तर याचा उल्लेख पंतप्रधान मोदींनी ऑस्ट्रेलियातील सभेत केला. भारताने केलेली लष्करी कारवाई हा दहशतवादाच्या विरोधातील आमची ठाम भूमिका संपूर्ण जगाला कळली आहे. भारताच्या सशस्त्र दलाची क्षमता आणि ताकद आता संपूर्ण जगाला कळली आहे, असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.

“ऑपरेशन सिंदूरच्या वेळी भारतीय सैन्याने दहशतवाद्यांच्या ठिकाणांना कशाप्रकारे उध्वस्त केले, हे तुम्ही पाहिले असेल. त्याचा प्रतिध्वनी जगभरात उमटला. भारताकडून जेव्हा दहशतवाद्यांचे कंबरडे मोडणारे हल्ले होतात, तेव्हा तुम्हाला अभिमान वाटत नाही का?”, असा प्रश्न पंतप्रधान मोदींनी उपस्थित लोकांना विचारला.

पंतप्रधान मोदी भारताच्या विकासाबाबत बोलताना म्हणाले, २१ व्या शतकात भारताने विकसित देश बनण्याच्या दृष्टीने आश्वासक असा प्रवास सुरू केला आहे. मेक इन इंडियाचा उल्लेख करत त्यांनी म्हटले की, भारतात तयार होणाऱ्या उत्पादनांना आता जगभरात ओळख मिळत आहे, तसेच त्याची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे.

भारताची संरक्षण क्षमता, आत्मनिर्भरतेकडे वाटचाल आणि दहशतवादाविरोधातील शून्य-सहिष्णुतेचे धोरण यामुळे जगभरात भारताची प्रतिमा अधिक भक्कम झाली असल्याचेही पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले. भारतीय प्रवासी नागरिकांनी देशाच्या प्रगतीत महत्त्वाचे योगदान दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

### अल्बानीज यांचा मोदींबरोबर सेल्फी

दरम्यान ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी पंतप्रधान मोदींबरोबर सेल्फी घेतला. एक्सवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये ते म्हणाले, “ऑस्ट्रेलिया आणि भारतीय व्यवसायांना सहकार्य करत आपण एकत्रितपणे अर्थव्यवस्थेचा विकास करत आहोत. व्यावसायिक यशोगाथेद्वारे दोन्ही देशातील लोकांमध्ये वेगळ्याच प्रकारचे बंध निर्माण झाले आहे. हे संबंध आणखी दृढ व्हावेत, यासाठी आपण पुढेही कार्यरत राहू.”

# करीनाचा नो मेकअप लुक!



बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर खान ही तिच्या दमदार अभिनयासोबतच स्टायलिश फॅशन सेन्ससाठीही ओळखली जाते. सोशल मीडियावर करीना सतत सक्रिय असते. या माध्यमातून ती नेहमी चाहत्यांसोबत कनेक्ट राहण्याचा प्रयत्न करत असते. सध्या ती कुटुंबासोबत सुट्ट्यांचा आनंद घेत असून, तिने व्हेकेशन टूरदरम्याचे काही फोटो इंस्टाग्राम अकाऊंटवरून शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये तिचा साधा पण आकर्षक अंदाज चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे. करीनाने पांढरा शर्ट, डोक्यावर स्टायलिश स्कार्फ आणि जाड काळ्या फ्रेमचा चष्मा परिधान केला आहे. साधेपणातही तिचा आत्मविश्वास आणि ग्लॅमरस लूक चाहत्यांना आकर्षित करत आहे. फोटोच्या कॅप्शनमध्ये करिनाने, "तुम्ही पाहू शकता, मला हा टाय खूप आवडतोय." असे म्हटले आहे. करीनाच्या नैसर्गिक लूकचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे. अनेक चाहत्यांनी तिच्या आत्मविश्वासाचे आणि मेकअपशिवाय फोटो शेअर करण्याच्या धाडसाचे स्वागत केले आहे. एका नेटकऱ्याने कमेंट करत लिहिले, "हे धाडस फक्त बेबोच करू शकते. या फोटोंमुळे कलाकारांनाही सामान्य माणसांप्रमाणेच नैसर्गिक त्वचा असते, हे दिसून येतं." असे एका नेटकऱ्याने म्हटले आहे. करीनाच्या या पोस्टवर चाहत्यांकडून लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव होत असून, तिचा साधा आणि नैसर्गिक अंदाज पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे. करीनाच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास दिग्दर्शिका मेघना गुलजार यांच्या आगामी दायरा चित्रपटात ती दिसणार आहे. याशिवाय वीरे दी वेडिंग २ आणि क्रू २ या चित्रपटावर काम सुरू असल्याचे सांगण्यात येत असून याबाबत लवकरच अधिकृत घोषणा केली जाणार असल्याचे समजते. या दोन्ही चित्रपटातील करीनाच्या भूमिकेची उत्सुकता चाहत्यांना लागली आहे.



## कियाराने 'टॉक्सिक'साठी किती मानधन घेतलं?

अनेकदा प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलल्यानंतर सुपरस्टार यशचा बहुचर्चित 'टॉक्सिक' हा चित्रपट अखेर २६ ऑगस्ट या दिवशी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या टीझरने उत्सुकता वाढवली असतानाच आता 'तबाही' या गाण्याने धुमाकूळ घातला आहे. या गाण्यात यश आणि कियारा अडवाणी यांच्यातील रोमँटिक केमिस्ट्री आणि काही इंटिमेट सीनमुळे नेटकऱ्यांनी चित्रपटाला तसेच निर्मात्यांवर टीकेची झोड उठली आहे. विशेषतः महिलांचे चित्रण ज्या पद्धतीने करण्यात आले आहे, त्यावर अनेकांनी आक्षेप घेत दिग्दर्शिका गीतू मोहनदास यांच्यावरही टीका केली आहे. त्यामुळे चित्रपट प्रदर्शनापूर्वीच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. दरम्यान, मीडिया रिपोर्ट्सनुसार, कियारा अडवाणीने या चित्रपटासाठी तब्बल १५ कोटी रुपये मानधन घेतले असून, तिच्या कारकिर्दीतील हे आतापर्यंतचे सर्वाधिक मानधन मानले जात आहे. तिने घेतलेल्या इतक्या मोठ्या मानधनाची चर्चा सुरू झाली आहे. या चित्रपटात कियारा अडवाणी, नयनतारा, रुक्मिणी वसंत, हुमा कुरेशी आणि तारा सुतारिया अशा पाच अभिनेत्री महत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. यामध्ये कियारा 'नादिया' या पात्रातून यशच्या प्रेयसीची भूमिका साकारत आहे. 'KGF 2'नंतर यशचा एकही चित्रपट प्रदर्शित झालेला नसल्याने 'टॉक्सिक'कडून प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरल्यास २०२६ हे वर्ष यशसाठी विशेष ठरू शकते. याच वर्षी दिवाळीत प्रदर्शित होणाऱ्या रामायण या चित्रपटातही तो रावणाच्या भूमिकेत झळकणार आहे.

# जान्हवीच्या मेहंदीत दिसलं बॉयफ्रेंडचं नाव

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर तिच्या अभिनयाइतकीच वैयक्तिक आयुष्यामुळेही कायम चर्चेत असते. गेल्या काही वर्षांपासून ती शिखर पहाडिया याला डेट करत असून दोघे अनेकदा एकत्र दिसतात. आता पुन्हा एकदा जान्हवीने आपल्या प्रेमाची खास झलक चाहत्यांना दाखवली आहे. बहिण अंशुला कपूरच्या लग्नातील मेहंदीमध्ये तिने शिखरचे नाव लिहून घेतल्यामुळे सोशल मीडियावर तिची जोरदार चर्चा रंगली आहे. अंशुला कपूरच्या लग्न आणि रिसेप्शन सोहळ्यात जान्हवी कपूरने सुंदर पारंपरिक लूकमध्ये उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमातील काही खास फोटो तिने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केले. या फोटोंपैकी एका फोटोमध्ये ती हातावरील मेहंदी दाखवताना दिसते. या मेहंदीमध्ये शिखर पहाडिया याचे नाव 'शिक्खू' असे लिहिलेले दिसते. हे पाहताच चाहत्यांचे लक्ष या फोटोवर गेले. विशेष म्हणजे, जान्हवी शिखरला प्रेमाने 'शिक्खू' या टोपणनावाने हाक मारते. 'कॉफी विथ करण' या कार्यक्रमात तिने स्वतः याचा खुलासा केला होता. इतकेच नाही, तर तिने मोबाईलमध्येही शिखरचा नंबर 'शिक्खू' या नावाने सेव्ह केल्याचे सांगितले होते. त्यामुळे मेहंदीमध्ये हेच नाव पाहून चाहत्यांना तिच्या नात्याची आणखी एक गोड झलक पाहायला मिळाली. जान्हवीने शिखरवरील प्रेम अशा प्रकारे व्यक्त करण्याची ही पहिली वेळ नाही. याआधीही तिने शिखरच्या नावाचे लॉकेट घातले होते. त्याचे फोटोही सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले होते. तसेच दोघे अनेकदा सुट्ट्यांमध्ये एकत्र फिरताना दिसतात. धार्मिक स्थळांना भेट देतानाही त्यांचे फोटो समोर आले आहेत. त्यामुळे दोघांचे नाते आता कोणापासूनही लपून राहिलेले नाही. जान्हवीच्या या नव्या पोस्टनंतर सोशल मीडियावर चाहत्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनेकांनी तिच्या आणि शिखरच्या नात्याचे कौतुक केले आहे. तर काहींनी "आता लग्नाची तयारी सुरू झाली का?" असा प्रश्नही उपस्थित केला आहे. मेहंदीत प्रियकराचे नाव लिहिण्याची परंपरा अनेक ठिकाणी लग्नाशी जोडली जाते.



# निवृत्तीनंतरही बेन स्टोक्स अडचणीत?

## ड्रेसिंग रूममधील 'त्या' कृत्यामुळे ICC कडून इंग्लंड क्रिकेट बोर्डाची चौकशी

**महाईन्यूज | इंग्लंड**

**इंग्लंड आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ३ कसोटी सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेत मायदेशात खेळताना इंग्लंडला २-१ ने पराभवाचा सामना करावा लागला. या मालिकेत अनेक नाट्यमय घटना घडल्या. मालिकेतील पहिला सामना जिंकल्यानंतर इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने इंग्लंड क्रिकेट बोर्डाच्या नियमांचं उल्लंघन केलं. त्यामुळे त्याला दुसऱ्या सामन्यातून बाहेर राहावं लागलं होतं. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात त्याने पुनरागमन केलं, पण हा सामना सुरु असतानाच त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. बीबीसीच्या वृत्तानुसार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसीने) बेन स्टोक्सच्या निवृत्तीच्या संदर्भात इंग्लंड क्रिकेट बोर्डाशी संपर्क साधला आहे.**

इंग्लंड आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमधील तिसरा कसोटी सामना ट्रेंट ब्रिजच्या मैदानावर पार पडला होता. या कसोटीतील चौथ्या दिवसाचा खेळ सुरु होण्याआधीच स्टोक्सने ड्रेसिंग रुममध्ये निवृत्तीचा निर्णय आपल्या सहकाऱ्यांना कळवला होता. स्टोक्सने आपला निर्णय सांगितल्याचा व्हिडीओ इंग्लंड क्रिकेट बोर्डाच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर प्रसिद्ध करण्यात आला होता. बीबीसीच्या वृत्तानुसार, आयसीसीने असा आरोप केला आहे की, आंतरराष्ट्रीय सामना सुरु असताना खेळाडू आणि अधिकाऱ्यांच्या क्षेत्रात (PLAYERS AND MATCH OFFICIALS AREA) काही नियमांचं पालन करणं बंधनकारक असतं. आयसीसीच्या कलम २.२.११ नुसार, कुठल्याही क्रिकेट बोर्डाला ड्रेसिंग रुममध्ये रेकॉर्डिंग करण्याची परवानगी नाही. आयसीसीने असा आरोप केला आहे की, इंग्लंड क्रिकेट बोर्डाने सामना समाप्त होण्यापूर्वीच बेन स्टोक्सने ड्रेसिंग रुममध्ये जे भाषण केलं, त्याचे व्हिडीओ रेकॉर्ड केले आणि सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर केले. हे आयसीसीच्या नियमांचं उल्लंघन आहे. हे नियम ड्रेसिंग रुमची गोपनियता टिकवून ठेवण्यासाठी बनवले गेले आहेत. आता आयसीसी काय कारवाई करणारहे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

चौथ्या दिवसाचा खेळ सुरु होण्याआधी बेन स्टोक्स निवृत्त होत असल्याची अधिकृत माहिती बाहेर आली होती. या दिवसाचा खेळ संपल्यानंतर स्टोक्सने याबाबत स्पष्टीकरण दिलं होतं. स्टोक्स निवृत्ती जाहीर करणार आहे, हे आधीच ठरलं होतं. मुख्य बाब म्हणजे, ज्यावेळी त्याने निवृत्तीची घोषणा केलीत त्यानंतर तो गोलंदाजी करण्यासाठी मैदानावर आला होता. यादरम्यान त्याने आपल्याच पहिल्याच चेंडूवर विकेट मिळवली होती. त्याने फॉल्क्सला झेलबाद करुन माघारी धाडलं होतं.

बेन स्टोक्सने बरेच वर्ष तिन्ही फॉरमॅटमध्ये इंग्लंडचं प्रतिनिधित्व केलं. तो जगातील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूंपैकी एक आहे. त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इंग्लंडकडून एकूण २७९ सामने खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्याने ११३२१ धावा केल्या.फलंदाजीसह त्याने गोलंदाजीतही दमदार कामगिरी केली. त्याच्या नावे एकूण ३५२ गडी बाद करण्याची नोंद आहे. मुख्य बाब म्हणजे, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करण्याआधी त्याने शेवटच्या सामन्यात मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला. स्टोक्सने कसोटी क्रिकेटमध्ये ७००० धावा आणि २५० विकेट्स पूर्ण केल्या. अशी कामगिरी करणारा तो जॅक कॅलिसनंतर जगातील दुसराच अष्टपैलू खेळाडू ठरला.



## मेस्सी, एम्बाप्पे की हालंड? फिफाच्या 'गोल्डन बूट'वर कोण कोरणार नाव?

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. या स्पर्धेतील राऊंड ऑफ १६ फेरीतील सामने पूर्ण झाले असून आता क्वार्टर फायनलच्या सामन्यांना सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत एकूण ६४ संघ जेतेपदाची ट्रॉफी जिंकण्यासाठी मैदानात उतरले होते. त्यापैकी केवळ ८ संघ शिल्लक राहिले आहेत.या स्पर्धेतील क्वार्टर फायनलच्या सामन्यांचं वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलं आहे. ही स्पर्धा कोणता संघ जिंकणार अशी जोरदार चर्चा रंगली आहे. यासह यंदाच्या वर्ल्डकप स्पर्धेत गोल्डन बूटचा मानकरी कोण ठरणार? अशी देखील चर्चा सुरु आहे. दरम्यान कोणते खेळाडू गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडीवर आहेत.**



### क्वार्टर फायनलचे सामने (भारतीय वेळेनुसार)

फ्रान्स विरुद्ध मोरोक्को – शुक्रवार, १० जुलै, रात्री १:३० वाजता
स्पेन विरुद्ध बेल्जियम – शनिवार, ११ जुलै, रात्री १२:३० वाजता
इंग्लंड विरुद्ध नॉर्वे- रविवार, १२ जुलै, रात्री २:३० वाजता
अर्जेंटिना विरुद्ध स्वित्झर्लंड- रविवार, १२ जुलै, सकाळी ६:३० वाजता

फिफा वर्ल्डकप स्पर्धेत सर्वाधिक गोल करणारा खेळाडू गोल्डन बूटचा मानकरी ठरतो. तर दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानी राहणाऱ्या खेळाडूला सिल्वर आणि ब्राँझ बूट दिला जातो. या स्पर्धेत अर्जेंटिनाने आतापर्यंत दमदार खेळ केला आहे. राऊंड ऑफ १६ फेरीतील सामन्यात अर्जेंटिनाने इजिप्तला पराभूत करुन टॉप ८ मध्ये प्रवेश केला आहे. अर्जेंटिनाला ही स्पर्धा जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे. तसेच अर्जेंटिनाचा स्टार लिओनेल मेस्सीला गोल्डन बूट जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे. मेस्सी सध्या ८ गोलसह गोल्डन बूटच्या शर्यतीत सर्वात आघाडीवर आहे. तर किलियन एम्बाप्पे या यादीत दुसऱ्या स्थानी आहे. एम्बाप्पेच्या नावे ७ गोल करण्याची नोंद आहे. तर नॉर्वेचा स्टार अर्लिंग हालंड या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. हालंडच्या नावे देखील ७ गोल करण्याची नोंद आहे. मुख्य बाब म्हणजे गोल्डन बूटच्या शर्यतीत असलेल टॉप ३ खेळाडू क्वार्टर फायनलचा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. त्यामुळे तिघांनाही गोल करुन या यादीत वर जाण्याची संधी असणार आहे.

यावेळी लिओनेल मेस्सीला गोल्डन बूट जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे. मुख्य बाब म्हणजे मेस्सीने आजवर एकदाही गोल्डन बूटचा मान पटकावलेला नाही. २०२२ मध्ये झालेल्या फिफा वर्ल्डकप स्पर्धेत अर्जेंटिनाने जेतेपदाचा मान पटकावला होता. या स्पर्धेत मेस्सीने ७ गोल केले होते. यासह सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो दुसऱ्या स्थानी होता. तर अंतिम सामन्यात पराभूत होणाऱ्या संघातील खेळाडू किलियन एम्बाप्पे ८ गोलसह गोल्डन बूटचा मानकरी ठरला होता. त्यामुळे यावेळी मेस्सी बाजी मारणार की पुन्हा एकदा एम्बाप्पे गोल्डन बूट पुरस्कार पटकावणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 10 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# 'जेवायला बसलोय'... भावेश यांचा शेवटचा मेसेज

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

मोशी येथील 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्पात बुधवारी (९ जुलै) झालेल्या भीषण दुर्घटनेत निगडी (रुपीनगर) येथे वास्तव्यास असलेले आणि मूळ जळगाव जिल्ह्यातील शिरसोली प्र.न. येथील रहिवासी भावेश मोहन वाणी (वय ३४) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे एका कष्टकरी कुटुंबाचा आधार हिरावला गेला असून, संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दुर्घटनेच्या काही क्षणांपूर्वी दुपारी १ वाजून ३१ मिनिटांनी भावेश यांनी आपल्या पत्नीला "जेवायला बसलो आहे" असा साधा संदेश पाठवला होता. मात्र, हाच त्यांचा शेवटचा संवाद ठरला. त्यानंतर काही वेळातच मोशी येथील 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्पाची तीन मजली प्रशासकीय इमारत कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली कोसळली. या दुर्घटनेत अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले असून, त्यांना बाहेर काढण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका, एनडीआरएफ आणि भारतीय सैन्याने युद्धपातळीवर बचावकार्य राबवले.

भावेश हे मोहन वाणी यांचे एकुलते एक पुत्र होते. पाच वर्षांपूर्वी बहिणीच्या निधनानंतर वृद्ध आई-वडिलांचा तेच एकमेव आधार होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वडिलांनी घरोघरी पापड व पाव विकून मुलाचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणात हुशार असलेल्या भावेश यांनी स्वतःच्या मेहनतीने नोकरी मिळवली आणि अवघ्या दीड वर्षांपूर्वी विवाह करून नव्या संसाराला सुरुवात केली होती.

मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या वृद्ध आई-वडिलांच्या डोळ्यांसमोरच त्याच्या अंत्ययात्रेची वेळ येणे, ही नियतीची क्रूर थट्टाच ठरली. या घटनेने वाणी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, शिरसोलीसह निगडी परिसरात शोककळा पसरली आहे.


## दीड वर्षांचा संसार क्षणात उद्ध्वस्त

अवघ्या दीड वर्षांपूर्वी विवाह करून नव्या आयुष्याला सुरुवात केलेल्या भावेश वाणी यांचे मोशी दुर्घटनेत निधन झाले. वृद्ध आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा आणि पत्नीचा जीवनसाथी क्षणार्धात हिरावला गेल्याने वाणी कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला आहे. संपूर्ण परिसरातून कुटुंबीयांप्रती हळहळ व्यक्त केली जात आहे.




D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026




*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# माऊलींच्या चरणस्पर्शाने पिंपरी-चिंचवड नगरी पावन..

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे महापालिकेच्या वतीने उत्साहात स्वागत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आळंदी येथून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आज सकाळी पिंपरी-चिंचवड नगरीत आगमन झाले,महापालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांनी त्यांच्या पालखीचे पुष्पहार अर्पण करून स्वागत केले.**




यावेळी आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, नगरसदस्य निखिल बोऱ्हाडे, सचिन तापकीर, जालिंदर शिंदे, सागर गवळी, नगरसदस्या योगिता नागरगोजे, सोनाली गव्हाणे, अर्चना सस्ते, कविता भोंगाळे, उप आयुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी परशुराम वाघमोडे, अजिंक्य येळे, डॉ. शिवाजी ढगे, डॉ. ऋतुजा लोखंडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मॅगझिन चौक परिसरात “ज्ञानोबा-तुकाराम”च्या अखंड जयघोषाने, टाळ-मृदुंगाच्या निनादाने आणि विठ्ठलनामाच्या गजराने वातावरण भक्तिमय झाले. पालखी मार्गावर भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून माऊलींचे दर्शन घेतले. या मंगलमय वातावरणात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात आले.

यावेळी पालखीसोबत असलेल्या प्रत्येक दिंडीला महापालिकेतर्फे आरोग्य किट (प्रथमोपचार पेटी) चे वितरण करण्यात आले. तसेच दिंडी प्रमुखांचा, वीणेकरांचा देशी बियाणांचे पाकीट देऊन सत्कार करून वारकरी परंपरेतील त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक गौरविण्यात आले.

मान्यवरांनी पालखी मार्गावरील विविध सुविधा व व्यवस्थेची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी महापालिकेने आरोग्य तपासणी केंद्रे, रुग्णवाहिका सेवा, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता मोहीम, तात्पुरती स्वच्छतागृहे, मुक्कामाची सुविधा, प्रकाशयोजना, अग्निसुरक्षा, आपत्कालीन यंत्रणा तसेच वाहतूक व्यवस्थापनाचे व्यापक नियोजन केले आहे.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी स्वतः ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष टाळ-मृदुंग वादन केले आणि फेर देखील धरला.

समता, सेवा, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या पवित्र पालखी सोहळ्याने पिंपरी-चिंचवड नगरी पुन्हा एकदा भक्तिमय झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# रावेत परिसरातील वीज-पाणीपुरवठ्याच्या समस्यांबाबत प्रशासन धारेवर!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे किवळे, रावेत, मामुर्डी आणि विकासनगर परिसरातील वीज व पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याच्या तक्रारींची दखल घेत आमदार शंकर जगताप यांनी संबंधित विभागांचा सविस्तर आढावा घेतला. नागरिकांना मूलभूत सुविधा अखंडितपणे मिळाव्यात यासाठी त्यांनी प्रशासनाला तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिले.**



> “अतिवृष्टीमुळे नागरिकांना कोणत्याही मूलभूत सुविधांसाठी त्रास सहन करावा लागू देणार नाही. वीज आणि पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाला तातडीने कामाला लागण्याचे निर्देश दिले आहेत. तात्पुरत्या उपाययोजनांसोबतच अशा समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठीही ठोस नियोजन केले जाईल. नागरिकांच्या सुरक्षिततेला आणि सुविधांना आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.
>
> – **शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

आढावा बैठकीत महावितरण, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग आणि अग्निशमन विभाग यांनी समन्वयाने काम करून नागरिकांच्या तक्रारी तातडीने सोडवाव्यात, असे निर्देश जगताप यांनी दिले. यासोबतच संबंधित भागांतील वीज उपकेंद्रे अधिक सक्षम करणे, ड्रेनेज व्यवस्था सुधारणे आणि नियमित पाणीपुरवठ्यासाठी प्रभावी नियोजन करण्यावर त्यांनी भर दिला.

महावितरणच्या वरिष्ठ तसेच निवृत्त अनुभवी अधिकाऱ्यांशी समन्वय साधून जुन्या वीजवाहिन्या, तांत्रिक अडचणी आणि वारंवार उद्भवणाऱ्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. आपत्कालीन परिस्थितीत महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी संवेदनशील भागांमध्ये वाय-फाय सुविधा उपलब्ध करण्याचाही प्रस्ताव त्यांनी मांडला.

पावसाळ्यात नागरिकांना वीज खंडित होणे, अंधार आणि पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश देतानाच पायाभूत सुविधांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवर दीर्घकालीन नियोजन करून काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेशही त्यांनी प्रशासनाला दिले.

“नागरिकांना अखंडित वीज आणि पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. सर्व संबंधित विभागांनी समन्वय, संवाद आणि तातडीची कार्यवाही या त्रिसूत्रीवर काम करून नागरिकांना दिलासा द्यावा,” अशी ठाम भूमिका आमदार शंकर जगताप यांनी यावेळी मांडली.

# प्रतिभा महाविद्यालयाचा वारकऱ्यांना सेवाभावी उपक्रम

## राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी वारीतून पथनाटयातून करणार व्यसनमुक्ती व सायबर जनजागृती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आज पहाटे जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी चिंचवडमधून मार्गस्थ झाली. यावेळी चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्यूटर स्टडीजच्या वतीने वारकऱ्यांसाठी सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.**






प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा व संचालिका डॉ. तेजल शहा यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनाखाली प्रतिभा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सुकलाल कुंभार व प्रा. सुप्रिया गायकवाड यांच्यासह सुमारे ४० विद्यार्थ्यांनी पालखीचे भक्तिभावाने स्वागत केले.

यावेळी पालखीतील दिंडीचे झेंडेकरी, पताकाधारी, टाळकरी, पखवाज वादक, विणेकरी तसेच तुळशी वृंदावन व पाण्याचे हांडे घेतलेल्या महिला वारकऱ्यांना बंद बाटलीतील पाणी, सकस व बंद पाकिटातील लाडू, केळी, सफरचंद यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पादुकांचे दर्शन घेऊन वारीचा मंगलमय प्रारंभ केला.

विद्यापीठाच्या सूचनेनुसार हे विद्यार्थी पालखीसोबत प्रवास करताना जागोजागी पथनाट्याद्वारे जनजागृती करणार आहेत. व्यसनमुक्ती आणि सायबर क्राईमुळे होणारी फसवणूक कशी टाळावी यावर जनतेला प्रबोधन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

याशिवाय वारीदरम्यान वारकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मदत करणे, मार्गदर्शन करणे यासारखी सामाजिक बांधिलकीची भूमिका देखील प्रतिभा महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी पार पाडणार आहेत.

समाजसेवेचा आणि अध्यात्माचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला. वारकऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले.

### राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी वारीतून करणार जनजागृती

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने प्रतिभा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे ६ विद्यार्थी प्रतिनिधी – अभिजीत वाघमारे, सत्यजित जाधव, सरस्वती जोशी, रिया गौतम, सिद्धेश जाधव व सार्थक गायकवाड यांची २१ दिवसांच्या वारी कॅम्पसाठी निवड करण्यात आली आहे.

# वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी; डॉ. डी. वाय. पाटील फार्मसी महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम



**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यात आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फार्मसीने वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविला. महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा, औषधांचे वाटप आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.**

वारीदरम्यान दीर्घ पायी प्रवास, अधूनमधून होणारा पाऊस, मुक्कामस्थळी बदलणारे पाणी तसेच हवामानातील बदल यांमुळे वारकऱ्यांना जुलाब, उलटी, अंगदुखी, सर्दी, ताप आदी किरकोळ आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन महाविद्यालयाने दरवर्षीप्रमाणे यंदाही आवश्यक ओटीसी (ओव्हर-द-काउंटर) औषधांचे मोफत वाटप केले. यासोबतच औषधांचा योग्य वापर, घ्यावयाची खबरदारी आणि आरोग्यविषयक समुपदेशनही करण्यात आले.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी धीरज सुराणा, युगल ओसवाल आणि प्रतीक चुत्तर यांनी सामाजिक उत्तरदायित्व जपत आवश्यक ओटीसी औषधे विनामूल्य उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांनी अशा समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सहभागी होत केवळ कुशल फार्मासिस्टच नव्हे, तर संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी केले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. मुकेश मोहिते, प्रा. पवनकुमार वानखडे, प्रा. शुभांगी दसवडकर तसेच विद्यार्थी प्रतिनिधी अथर्व सोनवणे, कृष्णा म्हसे, वेदांग जाधव, शार्दुल ढमाले आणि सानिका सांगवे यांनी विशेष परिश्रम घेतले. या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल संकुल संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम (नि.), विश्वस्त तेजस पाटील तसेच संस्थेचे अध्यक्ष सतेज पाटील यांनी महाविद्यालयाच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करून सहभागी सर्वांचे अभिनंदन केले.



# मोरया शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

श्रीधरनगर, चिंचवड येथील मोरया शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन तसेच इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षा २०२५-२६ मध्ये विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेजमधून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या तसेच ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. मनोजकुमार देवणे, संस्थेचे अध्यक्ष स्वप्निल शेडगे, कार्यवाह व प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर, खजिनदार रणजीत सावंत आणि तहहयात विश्वस्त ऋत्विक पिसोळकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी स्वागतगीत आणि ईशस्तवन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी डॉ. मनोजकुमार देवणे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाचा योग्य व जबाबदारीने वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले.

यानंतर क्रीडा, विविध बाह्य परीक्षा, गणित ऑलिंपियाड, इतिहास प्रज्ञाशोध स्पर्धा तसेच दहावी-बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह, पदक आणि पुष्प देऊन गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह गुणवंत शिक्षकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात कार्यवाह, तहहयात विश्वस्त तथा प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे-पिसोळकर यांनी संस्थेच्या गेल्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आणि प्रगतीचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. संस्थेचे अध्यक्ष स्वप्निल शेडगे यांनी संस्थेच्या विकासात शिक्षक, पालक आणि माजी विद्यार्थ्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास पालक-शिक्षक संघ, माता-पालक संघ, माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी, उपमुख्याध्यापक दिलीप कुमावत, पर्यवेक्षिका मैत्रेयी राजे, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नेहा यांनी केले, तर उपमुख्याध्यापक दिलीप कुमावत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# India: Between Promise and Paradox



India is the world's largest democracy. We Indians have made remarkable progress in recent years. We have one of the largest youth populations in the world. But India stands between promise and paradox. While the nation proudly showcases its democratic heritage and youthful population as its greatest strengths, beneath this image of progress lies a far more complex reality.

There are deep concerns about the Indian democratic system in recent years. Democracy is not limited to elections alone; it also heavily relies on principles like transparency and accountability. Concerns have been raised regarding the extent to which these values are being upheld. Concerns surrounding recent events, such as unfair election practices , including reports of sudden vote deletion before voting, have become matters of concern. Additionally, concerns regarding the independence and impartiality of sections of the media have become increasingly common. Critics argue that when media organizations appear too closely aligned with those in power, their ability to hold authorities accountable may be weakened. This has led to a gradual rise in public distrust of the media.

Yet no section of society bears the weight of these challenges more than the youth of the country. If democracy is the backbone of India, youth is its heartbeat. Our country's future depends on its youth. And yet, the state of Indian youth presents a troubling contrast to the nation's aspirations for progress and development. Recent controversies such as NEET ,TET have shaken students' faith and confidence in the fairness and Transparency of the system involved in organizing such important examinations. For many aspirants, years of relentless hard work appeared vulnerable to irregularities beyond their control, raising serious concerns about merit and equal opportunity.

The youth showed their frustration in different ways, through agitations,mass pradarshans and sometimes hunger strike or social media campaigns to attract attention of authorities . But they feel that these has not been given much importance and recognition adding to their anger and sometimes frustration,so the youth expects a deeper structural improvement and strong leakproof system to serve them better for such important aspects of their career and valuable time.

Together, these concerns paint a picture of a nation grappling with questions of trust, fairness, and opportunity. The true measure of India's progress will not be found in economic achievements alone, but also in the strength of its democracy and the confidence of its youth. Only by strengthening accountability, transparency, and equal opportunity can India transform its promises into reality.

**KARTIKI NIRVAL**
**Grade X (Ionion ),**
**Priyadarshani School,Moshi**

# ISRO: Where Dreams Rise Beyond the Sky



Every rocket that rises from Indian soil carries more than satellites—it carries the hopes of over a billion people. Behind these remarkable journeys stands the Indian Space Research Organisation (ISRO), an organisation that has transformed India's space dreams into global achievements.

From humble beginnings in 1969, ISRO has become one of the world's most admired space agencies. Chandrayaan-1 discovered evidence of water on the Moon, Mangalyaan reached Mars on India's first attempt, and Chandrayaan-3 made India the first nation to land near the Moon's south pole. These milestones inspire millions of young minds.

ISRO's satellites help farmers, improve communication, support weather forecasting, assist disaster management, and connect remote regions. Its achievements prove that science can improve everyday life.

As India prepares for future missions, ISRO continues to inspire students to dream big and aim high. It reminds us that with dedication, innovation, and teamwork, no dream is beyond our reach. As India prepares for ambitious missions ,including human spaceflight and deeper exploration of the solar system .one thing is certain that ISRO is not merely exploring space 'its shaping the future

When history remembers the great space explorers of our time , India 's story will shine among the brightest stars

**Samiksha Pujari**
**Class: 10th (Ionian)**
**Priyadarshani School,Moshi**